# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-५४ दिनांक - २१/०२/२०२४

## परीमंडळ १ मिरारोड च्या कार्यक्षेत्रात नाकाबंदीचे आयोजन.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परीमंडळ १, मिरारोड कार्यक्षेत्रामध्ये नव्याने २३६ नवप्रविष्ठ पोलीस अमंलदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे अधिकारक्षेत्रामध्ये मालमत्तेच्या गुन्हयांना प्रतिबंध व्हावा तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर शहरामध्ये सर्व पोलीस ठाणेचे हददीमध्ये नाकाबंदीचे आयोजन करण्यात येत आहे.

दिनांक २०/०२/२०२४ रोजी रात्रौ १९.०० ते २१.०० वाजे पंर्यत परीमंडळ १, मिरारोड कार्यक्षेत्रामध्ये एकुण २९ ठिकाणी ऑलआऊट नाकांबदीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एकुण १३३७ वाहने चेक करण्यात आले व वाहतुकीचे नियमाचे उल्लंघन करणारे एकुण २६९ वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

तसेच दिनांक २१/०२/२०२४ रोजी ११.०० ते १३.०० वाजे पंर्यत २९ ठिकाणी नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये एकुण ८९९ वाहने चेक करण्यात आले व वाहतुकीचे नियमाचे उल्लंघन करणारे एकुण १६६ वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वर नमूद **दोन दिवसात एकुण २२३६ वाहनांची तपासणी करुन एकुण ४३५ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आलेली आहे.** भविष्यातही अशाच प्रकारे कारवाई सुरु राहणार आहे.

मिरा भाईंदर शहरातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, नागरीकांनी वाहन चालवतांना लायसन्स व आवश्यक कागदपत्र सोबत बाळगावी. २) दुचाकी वाहनावर ट्रिपल सिट तसेच विना हेल्मेट फिरु नये, आपले दुचाकीस कर्कश आवाजाचे सायलेन्सर बसू नये.३) दारु अथवा अमंली पदार्थ प्राशन करुन वाहन चालवू नये. ४) दुचाकीवर घोषणा देत हुल्लडबाजी करत फिरु नये. ५) पालकांनी आपल्या १८ वर्षा खालील विना लायसन्स प्राप्त पाल्यास वाहन चालविणेस देवू नये.

इत्यादी मोटार वाहन कायदयाचे उल्लंघन करणारे इसमांवर यापुढेही नियमीत अशीच कारवाई सुरु राहणार आहे तरी नागरीकांना वाहतुकीचे नियमांचे पालन करुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

-----ooo-----